RNI No. MAHBIL/2009/31733

Reg. No. MH/MR/South-322/2010-12

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-अ

वर्ष ४, अंक २८] गुरूवार, जून ७, २०१२/ज्येष्ठ १७, शके १९३४ [पृष्ठे १०

किंमत : रुपये १४.००

**असाधारण क्रमांक ७३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधी व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ एप्रिल २०१२

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर. २०१०/प्र. क्र.५९३/का-दोन).—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि अस्तित्वात असलेले संबंधित सर्व नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या विधी

व न्याय विभागातील उप सचिव (विधि) (गट-अ), अवर सचिव (विधि) (गट-अ) आणि अधीक्षक (विधि) (गट-ब) या पदांच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे,—

१. (अ) या नियमांना, विधी व न्याय विभागातील, " उप सचिव (विधी) (गट-अ), अवर सचिव (विधि) (गट-अ), आणि अधीक्षक (विधि) (गट-ब) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ " असे संबोधण्यात यावे.

(ब) उप सचिव (विधि) (गट-अ), या पदाचे नियम दिनांक २६ मे १९९८ या दिनांकापासून अंमलात आले आहेत, असे समजण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " सहायक (विधी) " म्हणजे विधी व न्याय विभागाने आयोगाच्या शिफारशीनुसार नियुक्त केलेला सहायक (विधी) ;

(ब) " आयोग " म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(क) " पदवी " म्हणजे सांविधिक विद्यापीठाची पदवी ;

(ड) " विभाग " म्हणजे शासनाचा विधी व न्याय विभाग ;

(इ) " उप सचिव (विधि) " म्हणजे शासनाचा विधी व न्याय विभागातील आणि इतर मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतील उप सचिव (विधि) ;

(फ) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ग) " विधि शाखा " म्हणजे विभागातील विधि शाखा (प्रारूप शाखा वगळून) ;

(ह) " अधीक्षक विधि " म्हणजे विभागाच्या विधी शाखेतील अधीक्षक (विधि) ;

(य) " अवर सचिव (विधि) " म्हणजे शासनाचा विधी व न्याय विभागातील आणि इतर मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतील अवर सचिव (विधि).

३. " उप सचिव (विधी) " या पदावरील नेमणूक एकतर,—

(अ) " अवर सचिव (विधी) " हे पद धारण करीत असलेल्या व या पदावर तीन वर्षांहून कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तिंमधून, काटेकोर निवडीच्या आधारावर, ज्येष्ठतेनुसार, सुयोग्य व्यक्तिच्या पदोन्नतीने करण्यात येईल ; किंवा

(ब) " दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) " या पदावरील सेवेचा पाच वर्षांहून कमी नाही इतका अनुभव धारण करणाऱ्या सुयोग्य न्यायीक अधिकाऱ्यांच्या बदलीने करण्यात येईल.

४. " अवर सचिव (विधी) " या पदावरील नेमणूक एकतर,—

(अ) " अधीक्षक (विधी) " हे पद धारण करीत असलेल्या व या पदावर तीन वर्षांहून कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तिंमधून, ज्येष्ठतेच्या आधारावर, पात्रतेनुसार, सुयोग्य व्यक्तिच्या पदोन्नतीने करण्यात येईल ; किंवा

(ब) खालील उमेदवारांमधून नामनिर्देशनाने, जे,—

(एक) चाळीस वर्षांपेक्षा जास्त वयाचे नाहीत ; परंतु, जे उमेदवार या आधीच शासन सेवेत असतील, अशा उमेदवारांकरिता वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील ; आणि

(दोन) कायद्याची पदवी धारण करतात ; आणि

(तीन) खालील पद धारण करीत आहे किंवा धारण केलेले आहे,—

(१) " सहायक (विधी) " पद किमान ८ वर्षे ; किंवा

(२) " अधिक्षक (विधी) " पद किमान ५ वर्षे ; किंवा

(३) न्यायीक सेवेतील " दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग) " हे पद किमान दोन वर्षे ; किंवा

(४) उच्च न्यायालय किंवा त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान पाच वर्षे अधिवक्ता/वकील.

५. " अधीक्षक (विधी) " या पदावरील नेमणूक एकतर,—

(अ) " सहायक (विधी) " हे पद धारण करीत असलेल्या व या पदावर तीन वर्षांहून कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तिंमधून, ज्येष्ठतेच्या आधारावर, पात्रतेनुसार, सुयोग्य व्यक्तिच्या पदोन्नतीने करण्यात येईल ; किंवा

(ब) खालील उमेदवारांमधून नामनिर्देशनाने, जे,—

(एक) पस्तीस वर्षांपेक्षा जास्त वयाचे नाहीत ; परंतु, जे उमेदवार या आधीच शासन सेवेत असतील अशा उमेदवारांकरिता, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील ; आणि

(दोन) कायद्याची पदवी धारण करतात ; आणि

(तीन) खालील पद धारण करीत आहे किंवा धारण केलेले आहे,—

(१) " सहायक (विधी) " पद किमान ५ वर्षे ; किंवा

(२) उच्च न्यायालय किंवा त्यांचे अधिपत्याखालील इतर न्यायालयांमध्ये किमान तीन वर्षे अधिवक्ता/वकील.

६. नियम ४ पोट-नियम (ब), खंड (तीन) उप-खंड (एक), (दोन), (तीन) आणि (चार) आणि नियम ५ पोट-नियम (ब), खंड (तीन), उप-खंड (एक) आणि (दोन) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर, आयोगाच्या मते, अनुसूचित जाती (बौद्ध धर्मांतरित व्यक्तिंसह), अनुसूचीत जमाती आणि विमुक्त जाती/भटक्या जमाती या प्रवर्गांकरिता आवश्यक अर्हता धारण केलेले पुरेसे उमेदवार रिक्त असलेली पदे भरण्याकरिता निवडीसाठी उपलब्ध नसतील तर, आयोग अशा निवड प्रक्रियेमध्ये अनुभवाच्या अर्हतेचा कालावधी शिथील करून या जाती किंवा जमातीमधील सुयोग्य उमेदवारांची निवड करू शकेल.

७. " अवर सचिव (विधी) " आणि " अधीक्षक (विधी) " या पदावरील नेमणुका पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने अनुक्रमे ४० : ६० आणि ६७ : ३३ या प्रमाणात करण्यात येतील.

८. नियम ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तिचा परिविक्षा कालावधी दोन वर्षाचा असेल. परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त एका वर्षाने वाढविण्यात येईल. या पदांवर नियुक्त झालेल्या व्यक्तीस त्या पदांसाठी विहित केलेले प्रशिक्षण आणि विभागीय परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमांनुसार उत्तीर्ण होणे आणि परिविक्षा कालावधी विहित मुदतीत यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. जर त्याने/तिने विहित केलेले प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले नाही किंवा विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नाही किंवा विहित मुदतीत त्या पदासाठी तो/ती अपात्र आढळल्यास, त्याची/तिची सेवा कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय समाप्त करण्यात येईल.

९. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नती किंवा नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तिस, जर ती अगोदरच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, त्यासंबंधी करण्यात आलेल्या नियमांनुसार त्याला/तिला हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१०. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्ति, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी संगणक अर्हतेसंबंधी वेळोवेळी केलेल्या तरतुदींनुसार संगणक वापरासंबंधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेली व्यक्ती, विधी व न्याय विभाग, नागपूर व औरंगाबाद या कार्यालयांत किंवा कोणत्याही मंत्रालयीन प्रशासकीय विभागांत बदली होण्यास पात्र असेल, त्याचप्रमाणे ती व्यक्ती प्रशासकीय कारणास्तव विधी व न्याय विभागांच्या अधिपत्याखालील कोणत्याही कार्यालयांत प्रतिनियुक्तीने नियुक्त होण्यास पात्र राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**वि. ल. आचलिया,**

**शासनाचे प्रधान सचिव व विधी परामर्शी.**

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 13th April 2012.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR. 2010/C.R. 593/D. II.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all existing rules and orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating the recruitment to the posts of Deputy Secretary (Legal) (Group A), Under Secretary (Legal) (Group A), and Superintendent (Legal) (Group B), in the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra, namely :—

1. (*a*) These rules may be called " the Deputy Secretary (Legal) (Group A), Under Secretary (Legal) (Group A), and Superintendent (Legal) (Group B), in the Law and Judiciary Department (Recruitment) Rules, 2012."

(*b*) The rules for the post of Deputy Secretary (Legal), (Group A), shall be deemed to have come into force with effect from 26th May 1998.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " Assistant (Legal) " means a person appointed by the Law and Judiciary Department as Assistant (Legal) as per recommendations of Commission ;

(*b*) " Commission " means the Maharashtra Public Service Commission ;

(*c*) " Degree " means a degree of a statutory univeristy ;

(*d*) " Department " means the Law and Judiciary Department of the Government ;

(*e*) " Deputy Secretary (Legal) " means the Deputy Secretary (Legal) of the Law and Judiciary Department of the Government and other Departments of Mantralaya ;

(*f*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*g*) " Legal side " means the Legal side (excluding drafting section) of the Department ;

(*h*)" Superintendent (Legal) " means the Superintendent (Legal) of the legal side of the Department ;

(*i*) " Under Secretary (Legal) " means the Under Secretary (Legal) of the Law and Judiciary Department of the Government and other Departments of Mantralaya.

3. Appointment to the post of " Deputy Secretary (Legal) ", shall be made either,—

**(*a*) by promotion of a suitable person on the basis of strict selection with due regrd to seniority from amongst the persons holding the post of " Under Secretary (Legal)", having not less than three years regular service in that post ; or**

**(*b*) by transfer of a suitable Judicial officer from the cadre of Civil Judge (Senior Division), having not less than five years experience in that cadre.**

4. Appointment to the post of " Under Secretary (Legal) ", shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of " Superintendent (Legal) ", having not less than three years regular service in that post ; or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(I) are not more than forty years of age :

Provided that, the age limit may be relaxed by five years in case of candidates who are already in service of Government ; and

(II) possess a degree in Law ; and

(III) are holding or have held the post of,—

(*i*) " Assistant (Legal) " for a period of not less than eight years ; or

(*ii*) " Superintendent (Legal) " for a period of not less than five years ; or

(*iii*) " Civil Judge (Junior Division) and Judicial Magistrate First Class " in Judicial Service for a period of not less than two years ; or

(*iv*) have been an advocate in the High Court or Courts subordinate thereto, for a period of not less than five years.

5. Appointment to the post of " Superintendent (Legal) ", shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of " Assistant (Legal) ", having not less than three years regular service in that post ; or

(*b*) by nomination from amongst the candidates who,—

(I) are not more than thirty five years of age :

Provided that, the age limit may be relaxed by five years in case of candidates who are already in service of Government ; and

(II) possess a degree in Law ; and

(III) are holding or have held the post of,—

(*i*) " Assistant (Legal) " for a period not less than five years ; or

(*ii*) have been an advocate in the High Court or Courts subordinate thereto, for a period not less than three years.

6. Notwithstanding anything contained in sub-clauses (*i*), (*ii*), (*iii*) and (*iv*) of clause (III) of sub-rule (*b*) of rule 4, and sub-clauses (*i*) and (*ii*) or clause (III) of sub-rule (*b*) of rule 5, if at any stage of selection, the Commission is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite experience are not available to fill up the vacancies reserved for candidates belonging to Scheduled Castes (including converts to Buddhism), Scheduled Tribes and De-notified Tribes/Nomadic Tribes, then the Commission may, in the matters of such selection, relax the requirement in respect of the period of experience, and select suitable candidates belonging to such Castes or Tribes.

7. **The appointment to the posts of " Under Secretary (Legal) " and " Superintendent (Legal) " by promotion and nomination, shall be made in the ratio of 40 : 60 and 67 : 33 respectively.**

8. **A person appointed to the posts mentioned in rule 4 and 5 by nomination shall be on probation for a period of two years. Probation period may be extended maximum upto one year only. Person appointed to the posts shall be required to undergo such training and pass such Departmental Examination that may be prescribed for the posts and complete the probation successfully within prescribed period. If he/she does not complete prescribed training successfully or does not pass the Departmental Examination or not found suitable for the post within prescribed period, than he/she shall be liable to be terminated from service without prior notice.**

9. A person appointed to the posts mentioned in rule 3, 4 and 5 whether by promotion or by nomination shall be required to pass the examination in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

10. A person appointed to the posts mentioned in rule 3, 4 and 5 shall possess a certificate in computer operation prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra, from time to time.

11. A person appointed to the posts mentioned in rule 3, 4 and 5 shall be liable to be transferred to the offices of the Law and Judiciary Department, at Nagpur and Aurangabad or any of the Departments of Mantralaya as well as can be deputed to any other offices under the Law and Judiciary Department for administrative reasons.

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**V. L. ACHLIYA,**
**Principal Secretary and Remembrancer of Legal Affairs.**

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.